श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे छत्रपती शाहू महाराज जयंती कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत करण्यात आले होते. या कार्यक्रमांमध्ये " शाहू महाराजांचे समकालीन विचार" या विषयावर राष्ट्रीय सेवा दलाचे पदाधिकारी श्री. बाबासाहेब नदाफ यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. व्याख्यानामध्ये श्री. बाबासाहेब नदाफ यांनी शाहू महाराजांचे उदारमतवादी विचार, आरक्षणांमधील भूमिका तसेच जातीभेद दूर करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न व शेतकऱ्यांसाठी व रयतेसाठी केलेल्या विकासात्मक कामांबरोबरच त्यांच्या कार्याची ओळख करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने उपस्थित होते. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख उपप्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी श्री. अमीन इलाई बाणदार यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका कुमारी मोहिनी अंचलिया हिने केले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.